*Review Of Research*
Vol. 3, Issue. 1, Oct. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.ror.isrj.net
**ORIGINAL ARTICLE**

# *आद्य दलित लेखिका – मुक्ता साळवे'*

*निलेश व्यंकटराव देगांवकर*

सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग , कोहिनूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
खुलताबाद, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद .

***सारांश :***

भारतातील पहिल्या शिक्षिका महिलांच्या शिक्षणाचा उद्गात्या, क्रांतीकारक सत्यशोधकी विचारांच्या नेत्या सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतीराव फुले यांनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळेतील मांग जातीतील एक विद्यार्थिनी मुक्ता साळवे यांनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी 'मांग महारांच्या दुःखाविषयी निबंध' लिहून दलितांना अस्पृश्यांना भोगावे लागत असलेले हीन जीवन धर्मग्रंथांनी रूढ केलेले जाचक संकेत आणि त्यामुळे झालेली हतबल अवस्था यांचे विदारक दर्शन घडविले आहे.

## *प्रस्तावना–*

मुक्ताबाई साळवे यांनी लिहिलेला हा वैचारिक निबंध म्हणजे दलित, स्त्रीमुक्ती आणि सत्यशोधकीय साहित्याचे उगमस्थान आहे. स्वतःच्या धर्माचा व संस्कृतीचा अभिमान बाळगणाऱ्या सनातन्यांना मुक्ताबाईंनी अनेक रोकडे सवाल विचारले आहेत. आपले नाते अनार्य संस्कृतीशी जोडत आम्ही मांग–महार व बहुजनच या देशाचे खरे पोशिंदे असल्याचे स्पष्ट केले आहे. संस्कृतीच्या नावाखाली हजारो वर्षापासून आम्हाला गुलाम बनविलेल्या या हिंदू संस्कृतीत आमचे स्थान काय आहे? असा प्रश्न उपस्थित करून दलितांच्या ऱ्हासास जबाबदार असणाऱ्या देवालाही उघडं–नागडं करून ब्राह्मणी धर्माला, समाजव्यवस्थेला मुक्तपणे मारलेली वैचारिक चपराक आहे.

मुक्ताबाई साळवे यांनी या निबंधात मांग–महारांच्या पतनास जबाबदार असणाऱ्या 'वेदग्रंथा' वर आणि त्यांच्या निर्मिकार प्रखर टिका केली आहे. हा हल्ला करताना मुक्ता साळवे म्हणतात की, 'मांग–महारांसह सर्वांचा उत्पन्नकर्ता जगन्नाथ आहे तर मग अस्पृश्यांसाठी धर्मग्रंथ पठणास बंदी का? जर वेदपठणास बंदी आहे तर याचा अर्थ अस्पृश्यांसाठी धर्मग्रंथ नाही. तसेच वेदकर्ते झाडून पुसून ब्राह्मण आहेत तर, त्यांचे आचरण वेदसंहितेनुसार का नाही?' असे मुलभूत प्रश्न उपस्थित करून अस्पृश्यांसाठी असलेल्या धर्मग्रंथपठण बंदी प्रकरणी मुक्ताबाईंनी कडाडून हल्ला केला आहे. या निबंधात सार्वजनिक पाणवठ्यावर विहिरीवर अस्पृश्यांना घालण्यात आलेल्या बंदीवर आपले विचार व्यक्त करताना, त्या म्हणतात, पाणी ही निसर्गाची देणगी असून त्यावर सर्वांचा समान हक्क आहे. या पाण्याचा उपभोग दलित–सवर्णांना, गरीब–श्रीमंताना सारखा घेता आला पाहिजे. परंतु इथे मात्र असे होत नसून चार भावांपैकी एकच बंधू सारे पाणी लाटत आहे. धर्माच्या नावाखाली बाकी बंधूवर गुलामगीरी लादत आहे. ही गोष्ट माणुसकीला काळीमा फासणारी आहे, असं त्यांनी म्हंटलेलं आहे.

पुढे निरंकुश गुलामगिरीच्या अनुषंगाने त्यांनी म्हटले आहे की, आम्हाला निच समजून जंगम मालमत्तेपासून वंचित ठेवण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर या सवर्णांनी आपल्या भौतिक सुखांसाठी आमच्या पुर्वजांना तेल–शेंदूर पाजून इमारतींच्या पायात जिवंतपणे गाढले आहे. आम्हाला निर्वंश करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला. ब्राह्मणांनी जनावरांपेक्षाही आम्हाला नीच समजले. तसेच उत्तर पेशवाईत बाजीराव पेशवे यांच्या राजवटीत अस्पृश्यांवरील अमानुष अत्याचार प्रस्तुत केले. पेशवे आणि पुरोहित अस्पृश्यांच्या जीवनाचा कसा छळ करीत होते याचा उल्लेख त्यांनी आपल्या निबंधात केला आहे. विद्याबंदीमुळे अस्पृश्यांना नरकमय जीवन जगावे लागत असून एकट्या अविद्येमुळे भोगावे लागलेला यातनामय जीवनावर त्यांनी आपल्या निबंधातून प्रकाश टाकला आहे. सवर्ण मुलांकडून होणाऱ्या मानसिक व शारीरीक त्रासाचा पाढाच त्यांनी आपल्या निबंधातून वाचला. हा पाढा वाचताना माझ्या दुःखाची, यातनांची वाट मोकळी करताना मला अश्रु अनावर होत असल्याचे मुक्ताबाईंनी म्हंटले आहे.

परंतु इंग्रजी राजवटीमध्ये होत चाललेल्या बदलांमुळे, शैक्षणिक प्रक्रियेत होउ घातलेल्या परिवर्तनामुळे मला इंग्रजी प्रशासन दयाळू वाटत असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. मुक्ताबाईंनी आपल्या निबंधाच्या उत्तरार्धात पेशवाईतील अत्याचाराचे गोखले, आपटे, गिकमजी, आंधळा पानसरा काळ बोहार आदिंच्या नावाचा उल्लेख करून त्यांनी अस्पृश्यांवर केलेल्या अत्याचाराचे अतिशय प्रखर शब्दात त्यांनी वाभाडे काढली आहेत. इंग्रजी प्रशासनात होत असणाऱ्या सुधारणांमुळे आणि पेशवाईंची विल्हेवाट लावल्यामुळे मुक्ताबाईंनी इंग्रजी प्रशासनाचे उपकार मानले आहेत. ब्राह्मण समाज सुधारक ही दलितांच्या मांग–महारांच्या उन्नतीसाठी झटत असल्याचा उल्लेख करून त्याविषयी समाधान व्यक्त केले आहे. समाजसुधारकांवरील स्वजातीयांच्या जाती बहिष्कृतीच्या हल्ल्यावर आश्चर्य व्यक्त करून त्यावर आपली तीव्र नाराजी दर्शविली आहे. शेवटी या निबंधाच समारोप करतांना सावित्रीबाईंनी व महात्मा जोतीराव फुल्यांनी सुरू केलेल्या शाळेचा, त्या शाळांना मदत करणाऱ्या इंग्रज सरकारचा उल्लेख करून मांग–महारांना व बहुजनांना शिक्षण घेण्याचे आवाहन केले आहे. शिक्षणाचे महत्व पटवून देताना मुक्ताबाई म्हणतात, अज्ञानामुळे मांग–महार बहूजन समाज हा रोग्यासमान होतो. तो सुदृढ होण्यासाठी ज्ञानरूपी औषध प्राशन करून शीलवंत, ज्ञानवंत व्हावे.

मुक्ताबाई साळवे यांनी आपल्या 'मांग–महाराच्या दुःखाविषयी निबंध' च्या पुर्वांर्धात अस्पृश्यांच्या समाज जीवनाच्या अवनतीचा आढावा घेउन मनुविचारप्रणालीवर घणाघाती प्रहार करून पेशवाईतील अस्पृश्यांवरील अमानुष अत्याचाराचा पाढा वाचला. तर उत्तरार्धात इंग्रजी सरकारमुळे होउ घातलेल्या परिवर्तनाचा, बदलाचा व समाज सुधारकांच्या कार्याचा गौरव केला. शेवटी अस्पृश्यता उधळून लावण्यासाठी मांग–महारांनी बहूजनांनी कठीण परिस्थितीतही शिक्षण घेउन ज्ञानवंत व शीलवंत होण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. शिक्षणाशिवाय आपली प्रगती शक्य नसल्याचे या आद्य दलित लेखिकेने आपल्या निबंधात ठासून सांगितले आहे.

मुक्ता साळवे यांनी लिहिलेला 'मांग–महारांचा दुःखाविषयी निबंध' हा ज्ञानोदय या मासिकात 15 फेब्रुवारी 1855 ला पहिल्यांदा प्रकाशित झाला. ज्ञानोदय मासिकाचे संपादक डॉ. सॅम्युअल बेकनं फेअरबॅक यांना हा निबंध एवढा आवडला की, आशयात कुठलाही फेरफार न करता, कोणतेही संपादकीय संस्कार न करता त्यांनी तो जशास तसा आपल्या मासिकातून छापला. 1855 मध्ये हा क्रांतीकारी निबंध लिहिणारी मुक्ता साळवे ही आद्य दलित लेखिका ठरते. महाराष्ट्रातील विचारवंत प्रा. हरी नरके यांनी देखील मुक्ता साळवेला आद्य दलित लेखिका म्हंटले आहे.

